Pune Police

## प्रेस नोट

**अमेरिकन डॉलर देतो असे सांगुन पैसे घेऊन न्युज पेपरचे रद्दीमध्ये साबणाची वडी देऊन फसवणुक करणाऱ्या दोन इसमांना ५ लाख रु. सह अटक करुन संघटित गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर प्रा.वि.गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी हडपसर पो.स्टे. कडील गुन्हा उघडकीस आणला.**

दि. ०७/०२/२०१८ रोजी संघटित गुन्हेगारी विरोधी पथक उत्तर प्रा.विभाग गुन्हे शाखा, पुणे शहर पोलीस निरीक्षक श्री. ब्रम्हानंद नाईकवाडी पोलीस स्टाफसह हडपसर पोलीस स्टेशनचे हददीत पेट्रोलिंग करत असताना पोलीस निरीक्षक नाईकवाडी यांना बातमी मिळाली की, दि. ०४/०२/२०१८ रोजी फिर्यादी नामे सनी अगरवाल रा. विमाननगर, पुणे यांचे कडुन वैभव टॉकीज, हडपसर या ठिकाणी ५,००,०००/- रुपये घेऊन यु.एस.ए. डॉलर करन्सी नोटा बदलुन देतो असे सांगुन चार जणांनी फसवणुक केली होती. त्या गुन्हयातील दोन आरोपी इसम दि. ०७/०२/२०१८ रोजी सायं. ०५:३० वा. सुमारास मंत्रीमार्केट, गाडीतळ, हडपसर, पुणे या ठिकाणी थांबले आहेत. त्यानुसार सापळा रचुन इसम नामे १) किशोर कुमार चंद्रदास वैष्णव, वय २६ वर्ष, रा. सर्वे नं ५१ बिटी कवडे रोड सिर्के कंपणी गेट नं २ समोर, लक्ष्मी रेसिडन्सी सोसायटी मुंढवा पुणे, २) सुनिल ऊर्फ राहुल सिंग छन्नुलाल वाल्मीकी वय - २८ रा. सर्वे नं ५१ बिटी कवडे रोड शिर्के कंपनी गेट नं २ समोर, लक्ष्मी रेसिडन्सी सोसायटी प्लॅट नं ४१२ मुंढवा पुणे यांना पकडुन त्यांनी फिर्यादी नामे सनी सतीष अगरवाल रा. विमाननगर, पुणे यांना यु.एस.ए. डॉलर देतो असे म्हणुन त्याने व त्याचे ओळखीची आणखीन एक मुलगी यांचे कडुन ५ लाख रु. घेऊन अमेरिकन डॉलर न देता न्युजपेपरचे कागदांमध्ये साबणाची वडी ठेवुन कॅरीबॅग देऊन त्यांची फसवणुक केल्याचे कबूल केले त्याबाबत हडपसर पो.स्टे. येथे गुरनं. १४२/२०१८ भादवि कलम ४०६,४२०,३४ हा गुन्हा दाखल आहे. त्या गुन्हयातील ५,००,०००/- रुपयेची रक्कम आरोपी अनु. क्र. १ याचे घरातुन हस्तगत केली आहे. हडपसर पो.स्टे. कडील नमुद गुन्हा उघडकीस आल्याने त्याबाबत सदर आरोपींना पुढील तपास कामी हडपसर पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. पंकज डाहणे, मा. सहा पोलीस आयुक्त, गुन्हे-२, श्री. संजय निकम, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवाडी, सहा पोनि गणेश पवार, पोउप निरीक्षक पोपटराव गायकवाड, कर्मचारी रमेश भिसे, नरेंद्र सोनवणे, राजनारायण देशमुख, भालचंद्र बोरकर, दिपक भुजबळ, प्रदीप शेलार, किरन चोरगे, अतुल मेंगे, दत्तात्रय फुलसंदर, कांतीलाल बनसुडे, तानाजी गाडे, नवनाथ चांदणे, निलेश शिवतरे, शितल शिंदे यांनी केलेली आहे.